नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ थे Year - 4rd | अंक - ४९ Issue - 49 | वार - सोमवार दि. १३ जुलै २०२६ Blow- Monday Date 13 JULLY 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## मुंबईत सुरक्षारक्षकाकडून चिमुरडीवर अत्याचार

### वॉशरूममध्ये घुसून सुरक्षारक्षकाचे अमानुष कृत्य; विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना घेराव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुंबईत पायधुनी परिसरातून एक अत्यंत धक्कादायक आणि संतापजनक घटना समोर आली आहे. एका ७ वर्षीय निष्पाप अल्पवयीन मुलीवर इमारतीच्या सुरक्षारक्षकाने (वॉचमन) बाथरूममध्ये घुसून लैंगिक अत्याचार केल्याची निंदनीय घटना घडली आहे. या पाशवी कृत्यानंतर संपूर्ण परिसरात तीव्र संतापाची लाट उसळली असून, संतप्त नागरिकांनी थेट पायधुनी पोलीस ठाण्याला वेढा घालत जोरदार निदर्शने केली.

या संपूर्ण प्रकरणी पायधुनी पोलिसांनी तत्काळ कायदेशीर पावले उचलत गुन्हा दाखल केला आहे. अत्याचार करणाऱ्या संबंधित नराधम सुरक्षारक्षकाला पोलिसांनी अटक केली असून त्याची कसून चौकशी सुरू आहे. या घटनेची माहिती मिळताच स्थानिक परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी आणि घटनेची माहिती घेण्यासाठी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर हे पायधुनी पोलीस ठाण्यात पोहोचले. मात्र, तिथे उपस्थित असलेल्या संतप्त नागरिकांनी आणि नातेवाईकांनी राहुल नार्वेकर यांनाच घेराव घातला आणि जोरदार विरोध दर्शवला. नराधम आरोपीला तत्काळ पोलीस स्टेशनमध्येच फाशी द्या अशी संतप्त मागणी नागरिकांकडून करण्यात येत होती, ज्यामुळे पोलीस ठाण्याच्या आवारात प्रचंड गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, पीडित ७ वर्षांची चिमुरडी इमारतीमधील वॉशरूमला गेली असताना, तिथे तैनात असलेल्या नराधम सुरक्षारक्षकाने आत प्रवेश केला आणि तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. या घटनेत मुलगी गंभीर जखमी झाली असून, तिला तातडीने जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. सध्या तिच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

पायधुनी पोलीस ठाण्याबाहेर जमावाचा एल्गार, रास्तारोको

घटनेची माहिती परिसरात वाऱ्यासारखी पसरताच नागरिकांच्या संतापाचा कडेलोट झाला. शेकडो नागरिकांनी एकत्र येत पायधुनी पोलीस ठाण्याला घेराव घातला. एवढेच नव्हे तर, संतप्त जमावाने पोलीस ठाण्यासमोरील मुख्य रस्ता अडवून धरत 'रास्तारोको' आंदोलन सुरू केले. यामुळे काही काळ वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती. पोलिसांनी संयमाने आंदोलक नागरिकांना बाजूला सारत आणि समजूत काढत रस्ता पुन्हा वाहतुकीसाठी मोकळा केला. सध्या कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून पोलीस ठाण्याबाहेर मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला आहे.

महिला व मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर

मुंबईसारख्या सुरक्षित मानल्या जाणाऱ्या शहरात सातत्याने महिला आणि अल्पवयीन मुलींवर होणाऱ्या अत्याचाराच्या घटनांमुळे नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. या ताज्या घटनेने मुंबईतील महिला आणि बालकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा अत्यंत गंभीरपणे ऐरणीवर आणला आहे.



## होर्मुझमध्ये व्यापारी जहाजावर इराणचा हल्ला; भारताचा तीव्र निषेध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : ओमानच्या किनाऱ्याजवळ होर्मुझ सामुद्रधुनीत सायप्रसच्या ध्वजाखालील 'जीएफएस गॅलेक्सी' या व्यापारी जहाजावर झालेल्या हल्ल्याचा भारताने तीव्र निषेध केला आहे. या जहाजावर ११ भारतीय नागरिक कार्यरत होते. त्यापैकी १० जणांची सुरक्षित सुटका करण्यात आली असून,



एका भारतीय खलाशाचा अद्यापही शोध सुरू आहे. परराष्ट्र मंत्रालयाने रविवारी जारी केलेल्या निवेदनात सांगितले की, ओमानमधील भारतीय दूतावास स्थानिक प्रशासनाच्या सतत संपर्कात असून शोध आणि बचाव मोहिमेवर बारकाईने लक्ष ठेवत आहे. या कारवाईसाठी सहकार्य केल्याबद्दल भारताने ओमान सरकारचे आभारही मानले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, जहाजावर झालेल्या हल्ल्यानंतर भीषण आग लागली. परिस्थिती गंभीर झाल्याने कर्मचाऱ्यांना जहाज सोडावे लागले. इराणने हा हल्ला इशारा देण्यासाठी केलेली कारवाई असल्याचा दावा केला असून, जहाज होर्मुझ सामुद्रधुनीतील कथित अनधिकृत मार्गाने प्रवास करत असल्याचे म्हटले आहे. तसेच या घटनेवर कोणतीही प्रत्युत्तरात्मक कारवाई झाल्यास त्याला कठोर उत्तर दिले जाईल, असा इशाराही इराणने दिला आहे.

**११ भारतीयांपैकी एक खलाशी बेपत्ता**

या घटनेमुळे इराण आणि अमेरिकेमधील तणाव आणखी वाढला आहे. प्रत्युत्तरादाखल अमेरिकेने इराणमधील क्षेपणास्त्र आणि ड्रोन तळ, नौदलाची साधने, दारुगोळा साठे, दळणवळण यंत्रणा आणि किनारी देखरेख केंद्रांवर नव्या हवाई कारवाया केल्या. अमेरिकेच्या सेंट्रल कमांडनुसार, ताज्या कारवाईत सुमारे १४० लष्करी लक्ष्यांवर हल्ले करण्यात आले असून, सलग तीन दिवसांत ३०० हून अधिक लक्ष्यांवर प्रहार करण्यात आला आहे. दरम्यान, व्यापारी जहाजांवर सातत्याने होणाऱ्या हल्ल्यांबाबत भारताने गंभीर चिंता व्यक्त केली आहे. तणाव तातडीने कमी करून राजनैतिक मार्गाने तोडगा काढण्याचे आवाहन भारताने केले आहे. तसेच नागरी पायाभूत सुविधा आणि व्यापारी जहाजांना लक्ष्य करणे त्वरित थांबवावे आणि आंतरराष्ट्रीय कायद्यांनुसार होर्मुझसह सर्व आंतरराष्ट्रीय जलमार्गांवरील जहाजवाहतूक कोणत्याही अडथळ्याशिवाय सुरू ठेवावी, अशी स्पष्ट भूमिका भारताने मांडली आहे.

## केंद्र सरकारने बोलावली सर्वपक्षीय बैठक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : केंद्र सरकारने संसदेच्या पावसाळी अधिवेशनाआधी सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. संसदेचं पावसाळी अधिवेशन यंदा २० जुलैपासून सुरु होणार आहे. पावसाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला केंद्र सरकारने सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. या बैठकीत केंद्र सरकार अधिवेशनात कोणकोणती विधेयक मांडणार, याबाबतचा अजेंडा सर्व पक्षांना सांगण्याची शक्यता आहे. यंदाचं संसदेचं पावसाळी अधिवेशन हे वादळी ठरण्याची शक्यता आहे.

केंद्रीय संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी संसदेचं पावसाळी अधिवेशन हे २० जुलै ते १३ ऑगस्ट या काळात होणार असल्याचं याआधीच जाहीर केलं आहे. त्याआधी १९ जुलैला सरकारने सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. ही बैठक सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात येणार असल्याची चर्चा आहे. केंद्र सरकार काही महत्त्कांक्षी विधेयक मंजूर करण्याच्या प्रयत्नात असणार आहे. त्याबाबत या बैठकीत चर्चा होते का? ते पाहणं आता महत्त्वाचं आहे. सरकारला विरोधकांकडून सहकार्याची अपेक्षा आहे. त्यामुळे या बैठकीत काय चर्चा होते ते पाहणं महत्त्वाचं आहे.



केंद्र सरकारला लोकसभेच्या मतदारसंघांची पुनर्रचना विधेयक आणि या विधेयकाशी संबंधित महिला आरक्षण विधेयक संसदेच्या दोन्ही सभागृहात मंजूर करायचं आहे. याआधी सरकारने बोलावलेल्या विशेष अधिवेशनात सरकारला हे विधेयक मंजूर करुन घेण्यात यश आलं नव्हतं. पण आता केंद्र सरकारला पाठिंबा असणाऱ्या खासदारांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसच्या खासदारांचा वेगळा गट स्थापन झाला आहे. तर महाराष्ट्रात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सात खासदारांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केला आहे. या घडामोडींमुळे सरकारला महत्त्वकांक्षी असणारे विधेयक मंजूर करुन घेण्यास मोठी मदत होणार आहे. याच विधेयकाच्या अनुषंगाने सरकारकडून सर्वपक्षीय बैठकीत काही आवाहन केलं जातं का? ते देखील पाहणं महत्त्वाचं आहे.

दरम्यान, यंदाचं संसदेचं पावसाळी अधिवेशन वेगवेगळ्या मुद्द्यांवरुन वादळी ठरण्याची शक्यता आहे. नीट पेपरफुटी, पक्षफुटीचे प्रकरणं या मुद्द्यांवरुन विरोधक केंद्र सरकारला घेरण्याचा प्रयत्न करु शकतात. यासोबतच इतरही काही मुद्द्यांवरुन विरोधकांकडून सरकारवर निशाणा साधला जाऊ शकतो. त्यामुळे संसदेच्या यंदाच्या पावसाळी अधिवेशनाकडे देशाचं लक्ष लागणार आहे.

## होर्मुझ सामुद्रधुनी पुन्हा बंद; इराणच्या निर्णयाने खळबळ, ट्रम्प संतप्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इराण : इराणच्या इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्सने रविवारी होर्मुझ सामुद्रधुनी बंद केल्याची घोषणा केली. चुकीच्या मार्गाने प्रवास करणाऱ्या एका जहाजावर कारवाई करून ते थांबवण्यात आल्याचा दावा खठत्रच्छ ने केला आहे. या घटनेनंतर परिसरातील तणाव आणखी वाढला असून, अमेरिकेने इराणविरोधात नव्या लष्करी कारवाया सुरू केल्याचे जाहीर केले आहे.

आयआरजीसीच्या नौदलाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, संबंधित जहाजाने आपली ट्रॅकिंग प्रणाली बंद करून समुद्री सुरक्षेला धोका निर्माण केला होता. त्यामुळे त्या जहाजावर कारवाई करण्यात आली आणि ते ताब्यात घेण्यात आले. मात्र, त्या जहाजाची ओळख किंवा इतर तपशील अद्याप जाहीर करण्यात आलेले नाहीत.

दरम्यान, अमेरिकेच्या सेंट्रल कमांडने इराणविरोधात तिसऱ्या टप्प्यातील हल्ले सुरू केल्याची माहिती दिली. अमेरिकेने आरोप केला की, इराणकडून व्यापारी जहाजांना लक्ष्य केले जात असून, त्यांची ही क्षमता कमी करण्यासाठी लष्करी कारवाई सुरू ठेवली जाईल.

अमेरिकन लष्कराने शनिवारी रात्री इराणविरोधात नवीन हल्ले सुरू केल्याचे सांगितले. हा या आठवड्यातील तिसरा हल्ला असल्याचेही स्पष्ट करण्यात आले. होर्मुझ सामुद्रधुनीतून जाणाऱ्या सायप्रसच्या ध्वजाखालील कंटेनर जहाजावर झालेल्या हल्ल्याच्या प्रत्युत्तरात ही कारवाई करण्यात आल्याचा दावा अमेरिकेने केला आहे. या हल्ल्यात जहाजावरील एका कर्मचाऱ्याचा अद्याप शोध लागलेला नसल्याचेही सांगण्यात आले. उएछढउजच ने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्स (द) वरील पोस्टमध्ये म्हटले की, व्यापारी जहाजांवरील पूर्वीच्या हल्ल्यांबाबत इराणला आंतरराष्ट्रीय करारांचे पालन करण्याची आणखी एक संधी देण्यात आली होती. मात्र, त्यातही इराण अपयशी ठरल्याचा आरोप अमेरिकेने केला आहे.

**देशाच्या सुमारे ७० टक्के भागातून मान्सूनचे ढग गायब**

## पहलगाममध्ये ढगफुटी, शेती-रस्ते वाहून गेले; उत्तराखंडमध्ये जलविद्युत प्रकल्पाजवळ भूस्खलन


**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

श्रीनगर : जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे शनिवारी रात्री ढगफुटीमुळे पूर आला. अनेक शेतांचे नुकसान झाले आणि रस्ते वाहून गेले. उत्तराखंडमधील विकासनगर येथे मुसळधार पावसामुळे लखवार जलविद्युत प्रकल्पाजवळ भूस्खलन झाले, ज्यात अनेक वाहने आणि यंत्रसामग्री गाडली गेली. देशाच्या सुमारे ७० टक्के भागातून मान्सूनचे ढग नाहीसे झाले आहेत. पुढील पाच दिवसांत राजस्थान, दिल्ली-एनसीआर, पश्चिम मध्य प्रदेश, गुजरात आणि महाराष्ट्रातही पावसाची शक्यता कमी आहे.

मान्सूनला सक्रिय ठेवणारी प्रणाली कमकुवत

पावसाला विराम मिळाल्याने मध्य प्रदेश, दिल्ली आणि पश्चिम उत्तर प्रदेशसह उत्तर भारतातील राज्यांमध्ये तापमान वाढले आहे. राजस्थानमधील श्रीगंगानगर येथे ४२ओउ तापमानाची नोंद झाली. पॅसिफिक महासागरात तीन हवामान प्रणाली तयार होत आहेत. जर या बंगालच्या उपसागरात पोहोचल्या, तर १८ ते २५ जुलै दरम्यान पावसाची दुसरी फेरी सुरू होऊ शकते. मान्सूनला सक्रिय ठेवणारी प्रणाली कमकुवत झाली आहे. हवामान विभागाच्या (खचऊ) मते, देशाच्या ७० टक्के भागातून मान्सूनचे ढग नाहीसे होण्यामागे सर्वात मोठे कारण म्हणजे मान्सूनला सक्रिय ठेवणारी प्रणाली कमकुवत होणे हे आहे. ९ जुलैनंतर बंगालच्या उपसागरात कोणतीही नवीन मजबूत कमी दाबाची प्रणाली तयार झाली नाही, ज्यामुळे मान्सूनच्या वाऱ्यांना पुरेशी आर्द्रता मिळू शकली नाही.

त्याचबरोबर, मान्सूनचा पट्टा त्याच्या नेहमीच्या जागेवरून उत्तरेकडे सरकला आहे. यामुळे मध्य, पश्चिम आणि दक्षिण भारताच्या मोठ्या भागांमध्ये ढग आणि पावसाचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी झाले आहे. सध्या, पाऊस प्रामुख्याने उत्तर भारत, पूर्वेकडील राज्ये आणि ईशान्य भारतापुरता मर्यादित आहे. आयएमडीच्या अंदाजानुसार, पुढील काही दिवसांत देशाच्या बहुतेक भागांमध्ये मान्सून पुन्हा सक्रिय होण्याची शक्यता नाही.



जुलै महिन्याच्या पहिल्या १० दिवसांतील देशातील पावसाचे विश्लेषण

ऑल इंडिया वेदरच्या मते, १२ जुलैनंतर काही दिवसांसाठी भारतातील मान्सून कमकुवत होऊ शकतो. कारण सध्या तीन प्रमुख जागतिक हवामान प्रणाली मान्सूनच्या विरोधात काम करत आहेत. याचा अर्थ असा की, जुलै महिन्याच्या पहिल्या १० दिवसांत एछडज (एल निनो/ला निनोशी संबंधित एक प्रणाली) चा प्रभाव मान्सूनसाठी फारसा चांगला नव्हता.

तथापि, चगज (मॅडेन-जुलियन ऑसिलेशन) आणि काही लहान हवामान प्रणाली सक्रिय होत्या, ज्यामुळे भारताच्या अनेक भागांमध्ये चांगला पाऊस झाला. १२ जुलैनंतर, तिन्ही प्रमुख प्रणाली एकाच वेळी मान्सूनच्या विरोधात जातील. याचा अर्थ असा की, मान्सूनला हिंद महासागर आणि पॅसिफिक महासागराकडून फारशी शक्ती मिळणार नाही. विषुववृत्तीय रॉस्बी लाटा देखील प्रतिकूल झाल्या आहेत, ज्यामुळे आर्द्रता आणि ऊर्जा भारताकडे येण्याऐवजी दुसऱ्या दिशेने वाहत आहे. चगज देखील एका कमकुवत टप्प्यात दाखल झाली आहे. चगज ही एक हवामान लाट आहे जी जिथे सक्रिय असते तिथे ढग आणि पर्जन्यवृष्टी वाढवते. सध्या, ती भारतासाठी अनुकूल नाही.

## संपादकीय....

### पावसाळी अधिवेशन

केंद्र सरकारने संसदेच्या पावसाळी अधिवेशनाआधी सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. संसदेचं पावसाळी अधिवेशन यंदा २० जुलैपासून सुरु होणार आहे. पावसाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला केंद्र सरकारने सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. या बैठकीत केंद्र सरकार अधिवेशनात कोणकोणती विधेयक मांडणार, याबाबतचा अजेंडा सर्व पक्षांना सांगण्याची शक्यता आहे. यंदाचं संसदेचं पावसाळी अधिवेशन हे वादळी ठरण्याची शक्यता आहे. केंद्रीय संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी संसदेचं पावसाळी अधिवेशन हे २० जुलै ते १३ ऑगस्ट या काळात होणार असल्याचं याआधीच जाहीर केलं आहे. त्याआधी १९ जुलैला सरकारने सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. ही बैठक सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात येणार असल्याची चर्चा आहे. केंद्र सरकार काही महत्त्कांक्षी विधेयक मंजूर करण्याच्या प्रयत्नात असणार आहे. त्याबाबत या बैठकीत चर्चा होते का? ते पाहणं आता महत्त्वाचं आहे. सरकारला विरोधकांकडून सहकार्याची अपेक्षा आहे. त्यामुळे या बैठकीत काय चर्चा होते ते पाहणं महत्त्वाचं आहे. केंद्र सरकारला लोकसभेच्या मतदारसंघांची पुनर्रचना विधेयक आणि या विधेयकाशी संबंधित महिला आरक्षण विधेयक संसदेच्या दोन्ही सभागृहात मंजूर करायचं आहे. याआधी सरकारने बोलावलेल्या विशेष अधिवेशनात सरकारला हे विधेयक मंजूर करुन घेण्यात यश आलं नव्हतं. पण आता केंद्र सरकारला पाठिंबा असणाऱ्या खासदारांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. दरम्यान, यंदाचं संसदेचं पावसाळी अधिवेशन वेगवेगळ्या मुद्द्यांवरुन वादळी ठरण्याची शक्यता आहे. नीट पेपरफुटी, पक्षफुटीचे प्रकरणं या मुद्द्यांवरुन विरोधक केंद्र सरकारला घेरण्याचा प्रयत्न करु शकतात.

# आधाराचा नांगर, मायेची पेरणी!

## पतीच्या निधनानंतर शेतीची धुरा सांभाळणाऱ्या दोन शेतकरी भगिनींना राहा लालसरे फाउंडेशनचा आधार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
निफाड/प्रतिनिधी

संकटाच्या काळात दिलेला आधार हा सर्वात मोठा दिलासा ठरतो, याचा प्रत्यय राहा लालसरे फाउंडेशनच्या सामाजिक उपक्रमातून आला. मा.उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे मुख्य जनसंपर्क अधिकारी तथा राहा लालसरे फाउंडेशनचे अध्यक्ष नितीन लालसरे यांच्या मार्गदर्शनाखाली देवगाव व डोंगरगाव ता.निफाड येथील दोन गरजू शेतकरी विधवा महिलांना त्यांच्या शेतीसाठी मोफत नांगरणी, मशागत, पेरणी, बियाणे व रासायनिक खतांची मदत करण्यात आली.

देवगाव येथील शेतकरी कै.महेश साबळे यांच्या ट्रॅक्टर अपघातातील दुर्दैवी निधनानंतर त्यांच्या पत्नी सौ.सविता साबळे यांच्यावर कुटुंबासह शेतीची संपूर्ण जबाबदारी आली. त्याचप्रमाणे डोंगरगाव येथील कै.सोमनाथ नागरे यांच्या अकाली निधनानंतर त्यांच्या पत्नी सौ.सोनाली नागरे यांनाही आर्थिक संकटाचा सामना करावा लागला. या दोन्ही कुटुंबांची परिस्थिती लक्षात घेऊन राहा लालसरे फाउंडेशनने पुढाकार घेत त्यांच्या शेतीसाठी मोफत नांगरणी, मशागत, पेरणी, बियाणे आणि रासायनिक खतांची संपूर्ण व्यवस्था करून दिली. देवगाव येथील साबळे यांच्या तीन एकर शेतीची संपूर्ण मशागत करण्यात आली, तर नागरे कुटुंबालाही आवश्यक कृषी मदत उपलब्ध करून देण्यात आली. या उपक्रमामुळे दोन्ही कुटुंबांना आर्थिक दिलासा मिळण्याबरोबरच त्यांच्या शेतीला नवसंजीवनी मिळाली असून संकटाच्या काळात फाउंडेशनने दिलेला हा आधार त्यांच्यासाठी मोलाचा ठरला आहे.



या उपक्रमामुळे संकटग्रस्त शेतकरी कुटुंबांना शेतीसाठी आवश्यक मदतीबरोबरच नव्या आशेचा आधार मिळाला असून परिसरातून राहा लालसरे फाउंडेशनच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक होत आहे. संकटाच्या काळात केवळ सहानुभूती व्यक्त न करता प्रत्यक्ष कृतीतून दोन शेतकरी कुटुंबांच्या शेतीची नांगरणी, मशागत, पेरणी, बियाणे व खतांची संपूर्ण जबाबदारी स्वीकारत फाउंडेशनने सामाजिक संवेदनशीलतेचा आदर्श निर्माण केला आहे.

यावेळी संपत नागरे, रविंद्र शिंदे, निलेश सालकाडे, सुनील आव्हाड, दत्तू आव्हाड, कोथमिरे सर, ग्रामसेवक रणजीत निकम आदी उपस्थित होते.

# परिवर्तनवादी साहित्याचे नवे पर्व सुरु; राज्यस्तरीय संमेलनाच्या नियोजनाला विचारांचे अधिष्ठान



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

समाजपरिवर्तनाच्या वैचारिक प्रवाहाला नवी ऊर्जा देण्याच्या उद्देशाने आगामी ऑक्टोबर महिन्यात आयोजित करण्यात येणाऱ्या पहिल्या राज्यस्तरीय परिवर्तनवादी साहित्य संमेलनाच्या नियोजनाची पहिली बैठक ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत प्रा. डॉ. ऋषिकेश कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. परिवर्तनवादी साहित्याची व्यापक दिशा, समकालीन समाजातील त्याची आवश्यकता आणि संमेलनाचे स्वरूप यावर या बैठकीत सखोल व विधायक चर्चा झाली.

साहित्य हे केवळ अभिव्यक्तीचे माध्यम नसून सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी शस्त्र आहे. फुले-शाहू-आंबेडकरांच्या समतावादी विचारपरंपरेला साहित्याच्या माध्यमातून अधिक व्यापक करण्याची आज नितांत गरज आहे, अशी भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली. परिवर्तनवादी लेखक, कवी, अभ्यासक, संशोधक, पत्रकार आणि सामाजिक चळवळीतील कार्यकर्ते यांना एकाच वैचारिक विचारपीठावर आणण्याच्या दृष्टीने हे संमेलन महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वासही व्यक्त करण्यात आला.

बैठकीत संमेलन अधिक व्यापक, अभ्यासपूर्ण आणि परिणामकारक कसे होईल, यावर विविध मान्यवरांनी मोलाच्या सूचना मांडल्या. संमेलनाची तारीख, स्थळ, संमेलनाध्यक्ष, प्रमुख पाहुणे तसेच विविध समित्यांची घोषणा पुढील नियोजन बैठकीत करण्यात येईल, असा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला.

यावेळी ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत प्रा. डॉ. ऋषिकेश कांबळे, प्रा. डॉ. शिवाजी वाठोरे, डॉ. धनराज गोंडाणे, के. ई. हरदास, प्रा. डॉ. प्रज्ञा साळवे, प्रा. भारत सिरसाट, ड. डी. व्ही. खिल्लारे, राहुल साळवे, ड. रवी

### साहित्यिक, विचारवंत, प्राध्यापक, समाजसेवक व कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त सहभाग

तायडे, मुकुंद सुरडकर, विनोद मोरे, डॉ. मधुकर दिवेकर, जीवन कुळकर्णी, अनंत भवरे आणि बाबुराव बनसोडे यांनी आपले विचार व्यक्त केले.

संमेलनाच्या तयारीला बळ देत ड. डी. व्ही. खिल्लारे यांनी संमेलनासाठी ₹५,००० रुपये निधी देण्याची घोषणा केली. त्यांच्या या योगदानाचे उपस्थितांनी स्वागत केले.

बैठकीस राहुल साळवे, अनिल वानखेडे, उत्तमराव मस्के, अनंत भवरे, विद्या साळवे, रामदास मगरे, भीमराव गाडेकर, डॉ. मधुकर दिवेकर, विनोद मोरे, के. ई. हरदास, डॉ. प्रज्ञा साळवे, सनीभाई लाहोर, ड. रवी तायडे, मुकुंद सुरडकर, जितेंद्र भवरे, डॉ. विजय कांबळे, प्रा. भारत सिरसाट, दशरथ भातपुडे, रमेश वानखेडे, विलास गोरे यांच्यासह अनेक साहित्यप्रेमी व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संमेलन मुख्यसंयोजक रतनकुमार साळवे यांनी केले. सूत्रसंचालन भीमराव गाडेकर यांनी केले, तर विनोद मोरे यांनी आभार मानले.

बैठकीचा समारोप आशावादी वातावरणात झाला. परिवर्तनवादी साहित्याला राज्यव्यापी स्वरूप देण्याच्या दिशेने ही बैठक महत्त्वपूर्ण ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. संमेलनाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्वांनी सामूहिक जबाबदारी स्वीकारत एकजुटीने कार्य करण्याचा निर्धार केला. संमेलनासंदर्भातील सर्व महत्त्वपूर्ण आणि अंतिम निर्णय पुढील नियोजन बैठकीत जाहीर करण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

## डॉ.आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश मीडियम स्कूलची वाटचाल प्रगती पथावर : राजश्री कदम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
वागदरी (एस.के. गायकवाड) : शिका! संघटित व्हा! संघर्ष करा! हा महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला मूलमंत्र आत्मसात करत शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, जो कोणी प्राशन करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही हा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराचा आदर्श समोर ठेवून डॉ.आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश मीडियम स्कूल नळदुर्ग ता.तुळजापूर चे संस्थापक,नगरसेवक तथा न.प. चे विरोधी पक्ष गटनेते मारुती खारवे यांनी सुरू केलेल्या डॉ. आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश मीडियम स्कूल नळदुर्गची शैक्षणिक वाटचाल प्रगतीपथावर असून समाधानकारक आहे असे प्रतिपादन भारतीय बौद्ध महासभेच्या धाराशिव जिल्हा अध्यक्ष राजश्री कदम यांनी येथे बोलताना केले.




दि. ११ जुलै २२६ रोजी भारतीय बौद्ध महासभेच्या जिल्हाध्यक्षा राजश्रीताई कदम यांनी या शाळेला धावती भेट दिली असता त्या बोलत होत्या. पुढे बोलताना त्या म्हणाल्या की महामानव भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनात्मक दृष्ट्या सुरू केलेली क्रांतिकारी शैक्षणिक चळवळ या अनुषंगाने मारुती खारवे पुढे घेवून जाण्याचा प्रयत्न करित आहेत त्याबद्दल त्यांचे करावे तेवढे कौतुक थोडेच आहे. या शाळेची आतापर्यंतची वाटचाल इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेचा निकालाची परंपरा आणि निकालाचा आलेख पाहता खूप समाधान वाटले. निश्चितच या शाळेतून बाहेर पडणारा विद्यार्थी हा एक सुसंस्कृत नागरिक म्हणून आणि त्यांनी भविष्यात करिअरसाठी निवडलेल्या त्यांच्या क्षेत्रात चमकतील. या प्रसंगी भारतीय बौद्ध महासभेचे तुळजापूर तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर बनसोडे,राकेश जेटीथोर,एस.के.गायकवाड उपस्थित होते.

### शासकीय निवासी शाळा नंगपुरामुर्री : प्रत्येक विद्यार्थ्यांनी बजावला मताचा अधिकार

# माझे मत- माझे अधिकार, लोकशाही पध्दतीने शालेय निवडणूक...!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
गोंदिया : तालुक्यातील नंगपुरामुर्री येथील छत्रपती शिवाजी महाराज पब्लिक स्कूल (अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा) येथे शनिवारी शालेय विद्यार्थी निवडणूक लोकशाही पध्दतीने घेण्यात आली.

यावेळी शाळेतील मुख्याध्यापक रविशंकर इठूले यांच्या नेतृत्वाखाली नीता भलमे, पी ए लांजेवार, मुन्नाभाई नंदागवळी, साधना पारधी, आशिष शहारे, प्रदीप ढवळे, कार्तिक शहारे, दीक्षा तुरकर, निशा गभणे आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

यावेळी तंत्रज्ञान उपयोगात आणून भ्रमणध्वनी, टॅब यावर अप्लिकेशन डाऊनलोड करून व्ही. व्ही. एम. मशीन तयार करण्यात आली. मतदान कक्ष. मतदान केंद्र, तसेच मतदान कार्यप्रणाली सांभाळणारी निवडणूक अधिकारी व त्यांचे टेबल असे सर्व साहित्य तक्रार करण्यात आली होती.

नाव नोंदणी करुन स्वाक्षरी घेतली, आकडेवारी लिहीली आणि मतदारांच्या बोटाला शाई लावून मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला आहे. नंतर सर्वांची आकडेवारी काढून शेवटचे निकाल जाहीर करण्यात आले. यामध्ये शालेय समित्या घोषित करून ही शालेय प्रतिनिधी अशी सार्वत्रिक निवडणूक घेण्यात आली.

यासर्व निवडणूक यशस्वी करण्यासाठी तुषार महाजन,प्रणय खांडेकर व संजय बडोले यांनी सहकार्य केले.





# स्वेरीच्या विद्यार्थ्यांची पेटेंट संदर्भात दमदार कामगिरी
# ऑटोनॉमस अभ्यासक्रमातून घडत आहेत संशोधक अभियंते

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
पंढरपूर: गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) च्या इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग या विभागातील द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी समाजोपयोगी तंत्रज्ञानावर आधारित तीन अभिनव संशोधन प्रकल्प विकसित करून त्यांचे पेटेंट प्रकाशित करण्यात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विशेष म्हणजे या विद्यार्थ्यांनी केवळ संशोधन प्रकल्पच विकसित केले नाहीत तर पेटंटचा शोध (प्रायर आर्ट सर्च), पेटंट मसुदा लेखन, दावे तयार करणे, अर्ज दाखल करणे आणि पेटंट प्रकाशित होईपर्यंतची संपूर्ण प्रक्रिया स्वतः पूर्ण केली आहे. विद्यार्थ्यांची ही कामगिरी स्वेरीमधील संशोधन संस्कृती आणि ऑटोनॉमस अभ्यासक्रमाच्या गुणवत्तेचे एक उत्तम उदाहरण ठरत आहे, हे मात्र निश्चित !

महिलांच्या सुरक्षिततेसाठी विकसित करण्यात आलेला 'ॲन ऑटोनॉमस वेअरेबल पर्सनल सेफ्टी सिस्टम् युटीलायझिंग मल्टी मॉडेल सेन्सर फ्युजन अँड रिअल टाईम कम्युनिकेशन' हा कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित परिधान करता येणारा सुरक्षा प्रकल्प स्वेरीमध्ये शिक्षण घेत असलेल्या पायल शिंदे, गौरी साळुंखे, श्रद्धा भोंग आणि आर्य परकाळे यांनी विकसित केला आहे. स्मार्ट बँड, स्मार्ट घड्याळ किंवा लॉकेटच्या स्वरूपात वापरता येणारी ही प्रणाली जीपीएस, त्वरणमापक, जायरोस्कोप आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांच्या साहाय्याने धोकादायक परिस्थिती ओळखते. आपत्कालीन प्रसंगी ही प्रणाली आपोआप मदतीचा संदेश आणि थेट स्थानाची माहिती कुटुंबीय तसेच पोलीस नियंत्रण कक्षाला पाठवते. ऊर्जा संवर्धनाला चालना देणारा 'थर्मो इलेक्ट्रीक जनरेटर बेस्ड सेल्फ पॉवर्ड किचेन एक्झाष्ट सिस्टम युजिंग गॅस स्टोव्ह, वेस्ट हिट रिकव्हरी' हा प्रकल्प ऋतुराज कोरे आणि ऋतुजा कोरे यांनी विकसित केला आहे.

यामध्ये गॅस स्टोव्हमधून वाया जाणाऱ्या उष्णतेपासून विद्युत ऊर्जा निर्माण करून त्याच ऊर्जेवर स्वयंपाकघरातील धूरनियंत्रक यंत्रणा चालविण्याची अभिनव संकल्पना या प्रकल्पातून साकारण्यात आली आहे तसेच 'क्लिअर फ्लो स्मार्ट मोनीटोरिंग इंडस्ट्रीजयल वेस्ट रीसर्क्युलेशन सिस्टम' हा औद्योगिक सांडपाण्याचे स्मार्ट निरीक्षण व पुनर्वापर करणारा पर्यावरणपूरक प्रकल्प श्वेता कोरे, साक्षी पाटील आणि प्रतीक्षा सावंत यांनी विकसित केला आहे.

ही प्रणाली सांडपाण्याची गुणवत्ता सतत तपासून त्याचा पुनर्वापर करण्यास मदत करते. स्वेरीच्या ऑटोनॉमस अभ्यासक्रमात बौद्धिक संपदा हक्क (आयपीआर), उत्पादन विकास, नवोपक्रम, उद्योजकता आणि संशोधन पद्धती यांसारख्या उद्योगाभिमुख विषयांचा समावेश असल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची दृष्टी विकसित होत आहे. त्यामुळे इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागातील विद्यार्थी स्वतः पेटंटचा मसुदा तयार करणे, दावे लिहिणे, अर्ज दाखल करणे आणि पेटंट प्रकाशित होईपर्यंतची संपूर्ण प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडत आहेत, ही बाब स्वेरीच्या सक्षम संशोधन संस्कृतीची साक्ष देणारी असून राज्यातील अभियांत्रिकी शिक्षणात महाविद्यालयाची वेगळी ओळख निर्माण करत आहे. महाविद्यालयातील अत्याधुनिक प्रयोगशाळा, संशोधनपूरक वातावरण आणि प्राध्यापकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन यामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष सामाजिक व औद्योगिक समस्यांवर नाविन्यपूर्ण उपाय विकसित करण्याची संधी मिळत आहे. परिणामी विद्यार्थ्यांना पेटंट, संशोधन, स्टार्टअप, उच्च शिक्षण आणि उद्योग क्षेत्रातील उत्तम संधी उपलब्ध होत असून ते शिक्षणासोबतच संशोधक अभियंते म्हणून पुढे येत आहेत. संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलीकम्युनिकेशन या विभागाच्या प्रमुख डॉ. निता तळवळकर आणि प्रा.आशुतोष गरड यांचे विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन लाभले.

विद्यार्थ्यांच्या या समाजोपयोगी, पर्यावरणपूरक आणि तंत्रज्ञानाधारित संशोधन कार्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, स्वेरी संशोधन, नवोपक्रम आणि पेटंट निर्मितीच्या क्षेत्रात नवी उंची गाठत असल्याचे या यशातून पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे, हे मात्र निश्चित!

**स्वेरीच्या नावातच 'रिसर्च' हा शब्द असल्याने सुरुवातीपासून शिक्षणासोबतच संशोधनाची संस्कृती स्वेरीमध्ये रुजली आहे. आजतागायत स्वेरीकडून एकूण ७९ पेटेंटस फाइल करण्यात आलेली आहेत. त्यापैकी ७६ पेटेंटस पब्लिश झालेली असून ०३ पेटेंटस प्रोसेस मध्ये आहेत आणि एकूण ०५ पेटेंटस ग्रँट झालेली आहेत.**

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# पंढरपूरात सायकल दिंडीचा क्रीडा प्राधिकरण संचालक पांडुरंग चाटे यांच्या हस्ते शुभारंभ

## पंढरपुरात चार हजार सायकल स्वारांची निघाली दिंडी; राज्यासह कर्नाटकातून निघालेली सायकल दिंडी पंढरपुरात विसावली; सायकल दिंडीने वारकरी परंपरेप्रमाणे केली नगर प्रदक्षिणा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : आषाढी शुद्ध एकादशी सोहळा २५ जुलै २०२६ रोजी होणार असून, या सोहळ्यासाठी महाराष्ट्रातून अनेक दिंड्या विविध पालखी सोहळ्यासोबत आषाढी यात्रा सोहळ्यासाठी पंढरपूरकडे येत आहेत. अशातच महाराष्ट्र व कर्नाटकातून चार हजार सायकल्सची दिंडी पंढरपुरात येऊन पोहोचली आहे. पंढरपुरात आज सायकल संमेलन पार पडले. यावेळी सायकल स्वारांनी वारकरी परंपरेप्रमाणे सायकल वरून नगरप्रदक्षणा केली. भारतीय क्रीडा प्राधिकरणचे संचालक पांडुरंग चाटे व आषाढी पंढरपूर सायकलवारी असोसिएशनचे अध्यक्ष उमेश परिचारक यांनी सायकल दिंडीचे उद्घाटन करून दिंडीत सहभाग घेतला

फिट इंडिया या राष्ट्रीय कार्यक्रम अंतर्गत या दिंडीमध्ये सायकल सारख्या व्यायामाचे महत्व पटवून देण्यात आले. जीवनशैलीबाबत जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता. सायकलिंग हा आरोग्यदायी, पर्यावरणपूरक व किफायतशीर वाहतुकीचा पर्याय असून नियमित सायकल वापरामुळे शारीरिक तंदुरुस्ती राखण्यास मदत होते, असा संदेश या वेळी देण्यात आला. राज्यातील कानाकोपऱ्यातून आलेल्या सायकल स्वारांमुळे





आज पंढरी नगरी वेगळ्याच आध्यात्मिक वातावरणात सामावून गेलेली पहायला मिळाली. यावेळी पंढरपूरचे तहसीलदार सचिन लंगुटे, मुख्याधिकारी महेश रोकडे, सेवानिवृत्त आयपीएस अधिकारी हरीष बैजल, यांच्यासह पंढरपूर सायकल्स क्लब व नाशिक सायकल क्लब आणि बारामती सायकल क्लब यांनी उत्तम प्रकारचे नियोजन केले होते.

# पिंपळगावात 'गणेश पर्व' टवाळखोरांवर पोलिसांचा धडक प्रहार





**नागरिकांमधून केले जात आहे समाधान व्यक्त ...तर गुन्हेगारांना भरली धडकी**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : पिंपळगाव बसवंत पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बसस्थानक परिसर, शाळा, महाविद्यालये आणि कोचिंग क्लासेसच्या परिसरात विद्यार्थिनी व नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी पिंपळगाव पोलिसांनी अचानक विशेष तपासणी व धडक मोहीम राबवली. पोलिसांच्या या अचानक झालेल्या कारवाईमुळे रोडरोमिओ, टवाळखोर आणि विनाकारण गर्दी करणाऱ्यांमध्ये चांगलीच खळबळ उडाली आहे.

पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक आंबादास बैरागी, पोलीस अंमलदार विकास वाळूज, सागर धात्रक, प्रशांत उगले यांनी विविध ठिकाणी पायी गस्त घालत संशयितांची कसून तपासणी केली. शैक्षणिक काम नसताना शाळा-महाविद्यालय व बसस्थानक परिसरात विनाकारण फिरणे, मोठ्याने आरडाओरडा करून सार्वजनिक शांतता भंग करणे, शिट्ट्या मारणे, रोडरोमिओगिरी करणे आणि कायदा-सुव्यवस्थेला बाधा पोहोचवणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात आली. या मोहिमेदरम्यान एका टवाळखोराविरुद्ध पिंपळगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

**रोड रोमिओंची धावपळ पो. नि. गुरव यांची सिंघम स्टाईलने कारवाई**

**विद्यार्थ्यांना सुरक्षित, निर्भय आणि सकारात्मक शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देणे हे पोलिसांचे प्राथमिक कर्तव्य आहे. शाळा-महाविद्यालय परिसरात टवाळखोरी, रोडरोमिओगिरी किंवा सार्वजनिक ठिकाणी असभ्य वर्तन अजिबात खपवून घेतले जाणार नाही. असे प्रकार आढळल्यास तत्काळ गुन्हे दाखल करून कठोर कारवाई केली जाईल.**

**– गणेश गुरव, पोलीस निरीक्षक, पिंपळगाव बसवंत**

# आषाढी यात्रेत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर; सहाशे अधिकाऱ्यांना नवीन मोबाईल देणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमी श्री विठ्ठल रुपये दर्शनासाठी २५ ते ३० लाख भाविक अधिक भाविक येण्याचा अंदाज प्रशासनाकडून व्यक्त करण्यात येत आहे. यात्रा खाली मोबाईल नेटवर्क जाम होत असल्यामुळे अधिकाऱ्यांना समन्वय साधण्यासाठी अडचणी निर्माण होत आहे.

त्यासाठी बीबी पीपी डी आर यंत्रणेचा वापर करण्यात येणार असून त्यासाठी तीन कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहे. आषाढी यात्रेमध्ये येणाऱ्या भाविकांना कोणतीही अडचण येऊ देऊ नये यासाठी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे त्यामुळे गेल्या महिन्यापासून आषाढी यात्रेचे नियोजन प्रशासनाकडून करण्यात येत आहे. पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली आषाढी यात्रा सुरळीत पार पाडण्यासाठी प्रयत्न केले जात आहे.

**बीबीपी पी डी आर साठी तीन कोटी रुपये खर्च**

आषाढी यात्रेत विठ्ठलाच्या दर्शनासाठी २५ ते ३० लाख भाविक अधिक येणार असल्याचे अंदाज प्रशासनाकडून करण्यात येत आहे. त्यामुळे मोबाईल नेटवर्क जाम होण्याची शक्यता आहे त्यामुळे अधिकाऱ्यांचा समन्वय साधण्यासाठी एखादी अनुचित घटना घडल्यास तात्काळ संपर्क साधने अडचणीत ठरणार आहे. अडचण लक्षात घेऊन प्रशासनाने यदाच्या आषाढी यात्रेमध्ये बीपी बीपी कार्यावित करण्याचा निर्णय घेतला आहे.

या यंत्रणामुळे सहाशे अधिकाऱ्यांचे मोबाईल जोडले जाणार आहेत. त्यामुळे यात्रा काळामध्ये अधिकाऱ्यांना समन्वय साधण्याचा संपर्क साधण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. या योजनेची काम एका मोबाईल कंपनीला देण्यात आले आहे. यासाठी सुमारे तीन कोटी रुपये खर्च येणार आहे एकंदरीत आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने आधुनिक तसं याचा वापर सुरू केला असल्याचे दिसून येत आहे.

# बार्टीच्या संविधान दिंडीचे उत्साहात उद्घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) यांच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या संविधान दिंडीचे उद्घाटन संस्थेच्या निबंधक डॉ. सुचिता शिंदे यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. यावेळी विस्तार व सेवा विभागाचे विभागप्रमुख डॉ. बबन जोगदंड, विभाग प्रमुख रवींद्र कदम, विभाग प्रमुख शुभांगी पाटील कदम, पुण्याचे समाजकल्याणचे सहाय्यक आयुक्त विशाल लोंढे तसेच अधिकारी, कर्मचारी आणि संविधानप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



संविधान दिंडीचा शुभारंभ पुण्यातील नाना पेठ येथून करण्यात आला. भारतीय राज्यघटनेची मूल्ये, समता, बंधुता, स्वातंत्र्य आणि न्याय यांचा व्यापक प्रचार-प्रसार करण्याच्या उद्देशाने या दिंडीचे आयोजन करण्यात आले आहे.

या दिंडीदरम्यान नागरिकांमध्ये संविधानाबाबत जनजागृती करण्यासाठी पथनाट्य, भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन, मोफत संविधान उद्देशिका वाटप, तसेच 'चालता-बोलता संविधान' अशा विविध लोकजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

**संविधान जनजागृतीचा अनोखा उपक्रम!**

गेल्या पाच वर्षांपासून बार्टीच्या वतीने ही संविधान दिंडी नियमितपणे आयोजित केली जात असून ती देहू-आळंदी ते पंढरपूर या मार्गावर प्रवास करते. यावर्षीही आकर्षक पद्धतीने सजविण्यात आलेल्या रथामध्ये भारतीय संविधानाची उद्देशिका, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महात्मा ज्योतिराव फुले छत्रपती शिवाजी महाराज व इतर संत, महापुरुष यांचे विचार तसेच संविधानातील मूलभूत मूल्ये प्रभावीपणे रथावर प्रदर्शित करण्यात आली आहेत.

संविधानाचा संदेश समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवून संविधानाविषयी जागरूकता निर्माण करणे आणि लोकशाही मूल्ये अधिक दृढ करणे हा या संविधान दिंडीमागील प्रमुख उद्देश असल्याचे आपल्या प्रास्ताविकात डॉ. जोगदंड यांनी सांगितले सांगितले. यावेळी उद्घाटनपर भाषणात निबंधक डॉ.सुचिता शिंदे यांनी संविधानिक मूल्य जनमानसात रुजविण्यासाठी ही दिंडी प्रेरणादायी ठरेल असे मत व्यक्त केले. बार्टीच्या महासंचालक दीपा मुधोळ- मुंडे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली ही दिंडी संविधानिक मूल्यांचा प्रचार प्रसार करत पंढरपूर येथे पोहोचणार आहे आषाढी एकादशी ला या दिंडीचा समारोप पंढरपूर येथे होणार असून यावेळी प्रबोधनात्मक कार्यक्रम व दिंडीचा समारोप होईल. पुणे येथे झालेल्या उद्घाटनपर कार्यक्रमानंतर शाहीर आनंद कीर्तने व संच यांची भक्तिमय व संविधानिक गीते झाली. बार्टीच्या समतादूत विभागाचा या दिंडीमध्ये विशेष सहभाग असणार असून त्यांच्या माध्यमातून वारकऱ्यांना संविधानाचे प्रास्ताविक ठिकठिकाणी वाटप करण्यात येईल.

ही दिंडी यशस्वी करण्यासाठी समतादुतच्या प्रकल्प अधिकारी शितल बंडगर यांच्यासह समतादुतसंविधान दिंडी उद्घाटन कार्यक्रमास किर्ती आखाडे, तेजस्विनी कांबळे, उषा कांबळे, संगीता शहाडे, प्रशांत कुलकर्णी, अनिता दहीकांबळे, भारती अवघडे, शशिकांत जाधव सहभागी झाले होते. तसेच उद्घाटनाच्या कार्यक्रमाला बार्टीमधील अधिकारी- कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## पत्रकारांना प्रवेश नाकारल्याने नाराजी, कारणावरून राजकीय चर्चांना उधाण

# लासलगाव बाजार समितीच्या सभापती - उपसभापती निवडीला 'ब्रेक'; सर्व १८ सदस्य उपस्थित; निर्णयाधिकारीच गैरहजर, निवडणूक तहकूब

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती व उपसभापती पदाच्या निवडणुकीसाठी आज शनिवार दि.११ जुलै रोजी आयोजित करण्यात आलेली विशेष सभा नाट्यमय घडामोडींमुळे तहकूब करण्यात आली. निवडणूक निर्णयाधिकारी तथा प्राधिकृत अधिकारी, सहाय्यक निबंधक कांतीलाल गायकवाड हे निर्धारित वेळेत सभास्थळीच न पोहोचल्याने निवड प्रक्रिया होऊ शकली नाही. विशेष म्हणजे, सत्ताधारी व विरोधी अशा दोन्ही गटांचे सर्व १८ सदस्य सभागृहात उपस्थित असतानाही निवडणूक पुढे ढकलावी लागल्याने बाजार समितीच्या राजकारणात विविध चर्चांना उधाण आले आहे.

सभापती ज्ञानेश्वर उर्फ डी.के. जगताप व उपसभापती संदीप दरेकर यांनी रोटेशन पद्धतीनुसार कार्यकाळ पूर्ण झाल्याने राजीनामे दिल्यानंतर रिक्त झालेल्या पदांसाठी आज शनिवार दि.११ जुलै रोजी सकाळी ११ वाजता विशेष सभा बोलाविण्यात आली होती. याप्रसंगी ज्ञानेश्वर जगताप, संदीप दरेकर, बाळासाहेब शिरसागर, भीमराज काळे, जयदत्त होळकर, गणेश डोमाडे, छबुराव जाधव, राजेंद्र डोखळे, सोनिया होळकर, सुवर्णा जगताप, डॉ.श्रीकांत आवारे, तानाजी आंधळे, पंढरीनाथ थोरे, महेश पठाडे, राजेंद्र बोरगुडे, प्रवीण कदम, बाळासाहेब दराडे, रमेश पालवे हे सर्व सदस्य सभेस उपस्थित होते. सत्ताधारी आणि विरोधी गटाचे सदस्य वेळेआधीच सभागृहात दाखल झाले. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत संपल्यानंतरही निर्णयाधिकारी न आल्याने सदस्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला. काही सदस्यांनी सभागृह सोडले, तर विरोधी गटातील सदस्यांनी सचिवांकडून निवडणूक तहकूब झाल्याचे लेखी पत्र घेतल्यानंतरच सभागृहातून बाहेर पडले. दरम्यान, जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडून बाजार समितीचे सचिव नरेंद्र वाढवणे यांना व्हॉट्सपद्वारे संदेश पाठवून प्राधिकृत अधिकारी कांतीलाल गायकवाड यांची अचानक प्रकृती बिघडल्याने ते सभेला उपस्थित राहू शकत नसल्याचे कळविण्यात आले. त्यामुळे ही सभा तहकूब करण्यात आली असून पुढील तारखेची माहिती स्वतंत्रपणे दिली जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

या निवडणुकीत अल्पमत - बहुमताच्या गणितामुळे सभापतीपदाच्या निवडीकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले होते. त्यामुळे ऐनवेळी निवडणूक तहकूब झाल्याने राजकीय वर्तुळात तर्क - वितर्कांना उधाण आले आहे.

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बाजार समिती कार्यालय परिसरात पोलीस उपअधीक्षक, सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षकांसह मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. निवडणूक प्रक्रियेचे वृत्तांकन करण्यासाठी आलेल्या पत्रकारांना बाजार समितीच्या मुख्य कार्यालयात प्रवेश नाकारण्यात आला. यापूर्वीच्या पदाधिकारी निवडणुकांमध्ये पत्रकारांना सभागृहाबाहेर बसून वृत्तसंकलनाची परवानगी दिली जात होती. मात्र, यावेळी पोलिसांनी कोणालाही प्रवेश न दिल्याने पत्रकारांनी नाराजी व्यक्त केली. प्रसारमाध्यमांना दूर ठेवण्यामागचे कारण काय? असा प्रश्नही उपस्थित करण्यात आला.





**केवळ बाजार समितीच्या पदाधिकारी निवडीसाठी एवढा मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्याची गरज काय होती? अठरा सदस्यांसाठी एवढा पोलीस बंदोबस्त कशासाठी? अवघे १८ सदस्य असताना आधारकार्ड व ओळखपत्रांची तपासणी करण्यात आली. सदस्य काय दंगेखोर आहेत का?**

**– जयदत्त होळकर, सदस्य, कृषी उत्पन्न बाजार समिती, लासलगाव**

**मोठा पोलिस बंदोबस्त व पत्रकारांना मज्जाव**

**निवडणूक कार्यक्रमानुसार सर्व १८ सदस्य सभागृहात उपस्थित होते. मात्र, निर्धारित वेळेत प्राधिकृत अधिकारी उपस्थित झाले नाहीत. त्यांच्याशी संपर्कही होऊ शकला नाही. त्यानंतर जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडून प्राधिकृत अधिकाऱ्यांची अचानक प्रकृती बिघडल्याने ते सभेला उपस्थित राहू शकत नसल्याचे कळविण्यात आले. त्यामुळे आजची सभा तहकूब करण्यात आली असून पुढील सभेची तारीख नंतर जाहीर करण्यात येईल.**

**– नरेंद्र वाढवणे, सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती, लासलगाव**

# ग्राम सुरक्षा सुरक्षारक्षकांना संरक्षक साहित्याचे वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वैराग : एकीकडे जिल्ह्यात दुष्काळी परिस्थिती आहे , तर दुसरीकडे ग्रामीण भागात चोऱ्यांचे प्रमाण वाढताना दिसत आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील सुरक्षा रक्षकांना वैराग पोलीस ठाण्याच्या वतीने संरक्षण करण्याच्या उद्देशाने ११ रोजी शनिवारी काठी व शिट्टीचे वाटप करण्यात आले.

वैराग पोलीस ठाणे हद्दीतील असणाऱ्या गावातील ग्राम सुरक्षा दलामध्ये काम करणाऱ्या सुरक्षारक्षक रात्रीच्या वेळी गस्त करताना मदत व्हावी, चोरीसारख्या घटनेवर नियंत्रण राखता यावे तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याकरिता ग्राम सुरक्षा दलातील सुरक्षारक्षक यांची वेळोवेळी मदत घेता येईल या उद्देशाने जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी , उपविभागीय पोलीस अधिकारी सुहास जगताप यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अमुल कादबाणे यांच्या हस्ते ग्राम सुरक्षा दलातील जवानांना काठी व शिट्टीचे वाटप करण्यात आले.

यावेळी ग्राम सुरक्षा दलाचे जवान, पोलीस कॉन्स्टेबल आकाश पवार, किसन कोलते, गणेश चव्हाण, शब्बीर पठाण, रुपेश सातपुते तसेच पोलीस पाटील हजर होते.

# आषाढी यात्रेसाठी राज्य परिवहन महामंडळाकडून ५ हजार ५०० विशेष बसेस सोडणार : परिवहन मंत्री, प्रताप सरनाईक

## ग्रुप बुकींग असल्यास राज्याच्या कोणत्याही गावातून थेट पंढरपूर पर्यंत बस मिळणार; आषाढी यात्रा नियोजन बैठक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : आषाढी यात्रेच्या सोहळ्यानिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविक पंढरपुरात येत असतात. राज्याच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या भाविकांचा प्रवास सुरक्षित व सुखकर व्हावा यासाठी राज्य परिवहन महामंडळाकडून यात्राकाळात ५ हजार ५०० विशेष बस सोडण्याचे नियोजन केले असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.




आषाढी यात्रा नियोजनासाठी चंद्रभागा बस स्थानक,पंढरपूर येथे एस टी महामंडळाच्या अधिकाऱ्यांच्या बैठकीत ते बोलत होते.यावेळी एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ माधव कुसेकर, नगराध्यक्षा श्रीमती प्रणिता भालके, प्रांताधिकारी सचिन इथापे, सहा. पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे, प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री नेरपगार, तहसीलदार सचिन लंगुटे, मुख्याधिकारी महेश रोकडे, विभागीय वाहतूक नियंत्रक अमोल गोंजारी व एसटी महामंडळाचे सर्व खाते प्रमुख उपस्थित होते.

यावेळी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, आषाढी यात्रा कालावधीत पंढरपूरातील विविध बसस्थानकांवर थांबलेल्या बसेसची अंतर्गत व बाह्य स्वच्छता, निर्जंतुकीकरण करावे, आषाढी यात्रेसाठी विशेष बससेवा असा दर्शनी फलक लावण्यात यावा, त्याचबरोबर चालक व वाहक यांच्या आरोग्याच्या वैद्यकीय तपासणीची बसस्थानक परिसरात व्यवस्था करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात यावी. परतीच्या प्रवासासाठी मोठ्या प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता लक्षात घेवून मार्गनिहाय स्वतंत्र रांगा तयार करून नियोजनबद्ध पद्धतीने प्रवाशांना बसेसमध्ये प्रवेश देण्यात यावा तसेच सर्व कर्मचाऱ्यांनी प्रवाशांशी सौजन्याने वागावे,अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

राज्यातील कोणत्याही गावातून ४० किंवा त्यापेक्षा अधिक भाविकांनी एकत्रित मागणी केल्यास त्या गावातून थेट पंढरपूरसाठी विशेष एसटी बस उपलब्ध करून दिली जाणार आहे. या विशेष बस सेवेतही शासनाच्या सर्व प्रवासी सवलती कायम राहणार आहेत. ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना 'अमृत ज्येष्ठ नागरिक योजना' अंतर्गत मोफत प्रवास, तर महिलांना 'महिला सन्मान योजना' अंतर्गत तिकीट दरात ५० टक्के सवलत दिली जाणार आहे. भाविकांनी आपल्या जवळच्या एसटी आगाराशी संपर्क साधून विशेष बसची नोंदणी करावी असे आवाहन परिवहन मंत्री श्री सरनाईक यांनी केले.

मागील वर्षी आषाढी यात्रेसाठी एसटीने ५ हजार १४५ विशेष बसेस चालवून तब्बल २१ लाख ९५ हजार भाविकांची सुरक्षित ने-आण केली होती. यंदा त्याहून अधिक सुक्ष्म नियोजन करण्यात आले आहे. एकादशीच्या दिवशी लाखो भाविक परतीच्या प्रवासाला निघत असल्याने वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी एसटीचे ३६ हून अधिक वाहतूक नियंत्रक आणि सुरक्षा रक्षक नियुक्त करण्यात येणार आहेत. तसेच वारकरी भाविकांसाठी पंढरपूर व परिसरात चंद्रभागा, भीमा (देगाव), विठ्ठल कारखाना आणि पांडुरंग (आयटीआय महाविद्यालय) अशी चार तात्पुरती बस स्थानके उभारण्यात येणार आहेत. या स्थानकांवर पिण्याचे पाणी, सुलभ शौचालय, संगणकीय आरक्षण केंद्र, चौकशी कक्ष, मार्गदर्शन फलक आणि इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

वारी कालावधीत रात्रंदिवस सेवा बजावणाऱ्या महामंडळाच्या १३ हजार कर्मचाऱ्यांना यामध्ये चालक, वाहक, यांत्रिक कर्मचारी, पर्यवेक्षक आणि अधिकारी यांच्यासाठी चहा, नाश्ता आणि भोजनाची व्यवस्था मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्वखर्चाने केली आहे.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केली भीमा बसस्थानची पाहणी

आषाढी यात्रा शुद्ध एकादशी २५ जुलै २०२६ रोजी असून, आषाढी यात्रा सोहळ्यासाठी वारकरी-भाविकांची दिवसेंदिवस संख्या वाढत आहे. यात्रा कालावधीत श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी सुमारे १८ ते २० लाख वारकरी भाविक पंढरपुरात येतात. आषाढी यात्रेसाठी एस.टी ने येणाऱ्या वारकरी भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. या अनुषंगाने प्रवासी भाविकांच्या सुविधेसाठी महामंडाळामार्फत पंढरपूर व पंढरपूर परिसरात चार तात्पुरते बसस्थानक निर्माण करण्यात येतात. या अनुषंगाने आज परिवहन मंत्री प्रताप सरनाईक श्री.विठ्ठल कारखाना, देगाव येथे तात्पुरते भीमा बसस्थानकाची पाहणी केली.

यावेळी वारकरी भाविकांच्या सुविधेसाठी उभारण्यात आलेल्या भीमा बसस्थाकावर, सुलभ शौचालय, शुध्द पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छता, आरोग्य सुविधा, संगणकीय आरक्षण केंद्र, चौकशी कक्ष, मार्गदर्शन फलक, सीसीटीव्ही यंत्रणा तसेच सुरक्षेसाठी सुरक्षा रक्षक आदी बाबतची माहिती घेतली व संबधितांना आवश्यक सुचना त्यांनी यावेळी दिल्या.

---


# पडघा पंचशील नगरात विविध वृक्षांची लागवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भिवंडी प्रतिनिधी मिलिंद जाधव - पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत भिवंडी तालुक्यातील पडघा येथील पंचशील नगर परिसरात भिवंडी कृषीउत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती डॉ. संजय पाटील व पंचशील नगर नवतरुण मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपणाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी पंचशील नगर रस्त्याच्या दुतर्फा विविध प्रजातींच्या झाडांची लागवड करण्यात आली. परिसर अधिक हिरवागार व प्रदूषणमुक्त करण्याच्या उद्देशाने आयोजित या उपक्रमात स्थानिक नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. लावण्यात आलेल्या रोपांचे संगोपन करून त्यांना मोठे करण्याची जबाबदारीही नागरिकांनी स्वीकारली. कार्यक्रमास डॉ. संजय पाटील, पडघा ग्रामपंचायत सदस्य नासिर शेख, प्रताप विषे, प्रदीप गायकवाड, संदीप गायकवाड, योगेश डी.के., स्वप्नील साळुंखे, संतोष डीके, सोमनाथ पाटील, विकास वाकळे, तुषार जाधव आणि भरत जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. वाढते प्रदूषण आणि तापमान लक्षात घेता प्रत्येकाने किमान एक तरी झाड लावून त्याचे संवर्धन करावे, असा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. पंचशील नगर परिसरातील हा उपक्रम पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरत असून नागरिकांकडून त्याचे स्वागत करण्यात आले.



# परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी घेतले श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : राज्याचे परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी आज श्री विठ्ठल- रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले.

यावेळी मंदिर समितीच्या वतीने नगराध्यक्ष तथा मंदिर समितीच्या पदसिद्ध सदस्य प्रणिती भालके यांनी परिवहन मंत्री श्री सरनाईक यांचा शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देवून सत्कार करण्यात आला. यावेळी प्रांताधिकारी सचिन इतापे, मंदिर समितीचे व्यवस्थापक प्रवीण कुमार घम तसेच राज्य परिवहन महामंडळाचे अधिकारी यांच्यासह मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

---




# घोंगडे वस्ती येथे भव्य मोफत आरोग्य तपासणी शिबिर उत्साहात संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : घोंगडे वस्ती विराट हिंदू संमेलन समिति व गीतगंगा सोशल फाऊंडेशन आणि मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने घोंगडे वस्ती येथील घोंगडे वस्ती या भागातील सर्व नागरिक व रहिवासी करिता भव्य मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

शिबिरात सहभागी झालेल्या नागरिकांची जनरल आरोग्य तपासणी व मोफत औषध, शुगर (इश्रेव डींसरी), रक्तदाब (इझ), डोळे व दंत तपासणी ( डॉ करण आकुडे ) करण्यात आली. तसेच मोतीबिंदू तपासणी ( राजशेखर जेयुरे) करून पात्र रुग्णांची मोफत शस्त्रक्रियेसाठी नोंदणी करण्यात आली. सोबत डखठ मतदान प्रक्रिया करण्यात आले , या उपक्रमाचा घोंगडे वस्ती परिसरातील अनेक माता भगिनी व पुरुष मंडळानी एकूण १७२ अधिक संख्येने लाभ घेतला.

या शिबिराचे आयोजन घोंगडे वस्ती विराट हिंदू संमेलनाचे संयोजक नितीन शेजुळ व गीतगंगा फाऊंडेशनचे संस्थापक प्रमुख व्यंकटेश कंची, मुख्यमंत्री सहायता कक्ष संयोजक कैलास चौधरी यांच्या पुढाकाराने करण्यात आले. यावेळी उपस्थित शिवस्मारक अध्यक्ष रंगनाथ बंकापूरे, भटक्या विमुक्त प्रांत कार्यकर्ते अशोक संकलेचा, जिल्हा सेवा प्रमुख श्री करपे, गीतगंगा फाऊंडेशन सचिव चंद्रकांत कंची खजिनदार वेणुगोपाल उत्तुर, दयानंद नगर कार्यवाह चंद्रकांत जक्कन, नगर सेवा प्रमुख गणेश मादगुंडी, तसेच राकेशचंद्र केसरवाणी, विनायक मादम, विनायक सामलेटी, परमेश्वर क्षीरसागर श्रीनिवास दासरी यांनी उपक्रमाच्या यशस्वितेसाठी विशेष सहकार्य केले.

या शिबिरास मान्यवर आमदार विजयकुमार देशमुख मालक, नगरसेवक ज्ञानेश्वर म्याकल , नगरसेवक राजकुमार पाटील व मंडळ अध्यक्ष दत्ता बडगु याचाही उपस्थिती लाभली.

प्रास्ताविक चन्नेश इंडी सर यांनी केले, कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी समिती सदस्य रवी दासरी, अनिल म्हता, प्रभाकर बिंगी, नरेश म्हता, भालचंद्र गालपल्ली, सत्यनारायण नडीमेटला, नागेश मलजी यांनी परिश्रम घेतले. उपस्थित नागरिकांनी या सामाजिक उपक्रमाचे स्वागत करून आयोजकांचे कौतुक केले.

---

## आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाची तयारी

# श्री विठ्ठल रुक्मिणी मातीचे १६ जुलैपासून २४ सात दर्शन सुरू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : आषाढी यात्रेपूर्वी संतांचे पालखी सोहळे पंढरपूर मध्ये दाखल झाले आहेत. त्यामुळे पंढरपूर येणाऱ्या भाविकांची संख्या वाढली असून, भाविकांना सुलभ दर्शन मिळावे यासाठी मंदिर समितीने दिनांक १६ जुलैपासून २४ सात दर्शन सेवा सुरू करण्यात आली आहे. दर्शन बागेतील भाविकांना अन्नदानाबरोबर आरोग्याच्या तपासणी करण्यात येणार आहेत. असे मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली आहे. यंदाच्या वर्षी आषाढी वारीमध्ये २५ लाख भाविक येण्याचा अंदाज प्रशासनाकडून व्यक्त करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीने तयारी सुरू केली आहे. गोपाळपूर रोडवर भाविकांना पावसाचा त्रास होऊ नये यासाठी वॉटरप्रूफ दर्शन मंडप उभारण्यात आला आहे. विठ्ठल अभियांत्रिकी महाविद्यालयाकडून बँकेतील करण्यात आले आहे. जेणेकरून दर्शन रांगेमध्ये भाविकांना भोजपुरी करण्यात येणार नाही. दर्शन रांगेमध्ये भाविकांना तीन वेळा अन्नदान करण्यात येणार आहे. दर्शन रांगेत कुलर व पंख्याची सोय करण्यात आली असून. विश्रांती कक्ष निर्माण करण्यात आले आहेत. तसेच एखाद्या भाविकाला त्रास होत असल्यास त्याला तात्काळ उपचार करण्यासाठी आरोग्य पथक नेमण्यात आले आहे. दर्शन रांगेतील भाविकांना विठ्ठलाचे लाईव्ह दर्शन मिळणार आहे. पंढरपूर मध्ये येणारा भाविक विठ्ठलाचे प्रसाद म्हणून बुद्धीचे लाडू घेत असतात हे बुंदीचे लाडू गुणवत्तापूर्ण बनवण्यात येणार आहे. आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीने पूर्ण तयारी केली आहे. सुमारे २५ लाख भाविक येण्याचा अंदाज वर्तवण्यात येत आहे. भाविकांना आवश्यक सुविधा देण्याबाबत रांगेमध्ये भाविकांना विश्रांती घेण्यासाठी विश्रांत कक्षाची व्यवस्था करण्यात आली आहे. यासाठी सर्वतोपरी तयारी करण्यात आल्याचे श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली आहे. त्यांनी १६ जुलैपासून २४ तास दर्शन देण्याची व्यवस्था ही केली असल्याचे सांगितले.





# वाखरी पालखी तळ, भक्ती सागर येथे स्वच्छता मोहिम सुरू - मुख्याधिकारी महेश रोकडे

**आषाढी यात्रेसाठी नगरपालिका प्रशासनाची तयारी**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : जगद्गुरु संत तुकाराम व संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माउली यांच्या विविध पालख्यांचे प्रस्थान पंढरपूरच्या दिशेने सुरु आहे. लाखोच्या संख्येने भाविक पालखी सोहळ्यात सहभागी झाले आहेत. याच भाविकांना चांगल्या सेवा सुविधा देण्यासाठी नगरपालिकेने वाखरी पालखी तळ, भक्तीसागर ६५ एकरात स्वच्छता मोहिम राबवली आहे. तसेच पंढरपूर परिसरात अत्यावश्यक सेवासुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहे. पंढरपूर नगरपालिका प्रशासन आषाढी यात्रेसाठी सज्ज झाले असल्याची माहिती मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली.

ी यात्रा एकादशीचा मुख्य सोहळा दि. २५ जुलै रोजी साजरा होत आहे.या यात्रेकरीता १८ ते २० लाख भाविक येण्याचा प्रशासनाचा अंदाज आहे. त्यानुसार प्रशासनाने नियोजन करुन तयारी सुरु केली आहे. अतिक्रमणे काढत भाविकांना वाट मोकळी करुन देण्यात आली आहे. तर पाणी पुरवठा, वीज, आरोग्य सुविधा, तसेच स्वच्छता मोहिम राबवण्यात येत आहे.



वाखरी पालखी तळ येथे सर्वच मानाच्या पालखीचा मुक्काम असतो. त्यामुळे या ठिकाणी मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी असते.भाविकांना कोणताही त्रास होणार नाही, याची दक्षता नगरपालिकेने घेतली आहे. त्यामुळे पाळखी तळ परिसरातील गवत, दगड काढण्यात आले असून संपूर्ण मैदान स्वच्छ करण्यात येत आहे. तसेच मुरूमीकरण करुन रोलरद्वारे सपाटीकरणाची कामे सुरु आहेत. परिसरातील झाडांना रंग देण्याचे काम देखील सुरु आहे. संपूर्ण परिसरातील काटेरी झाडे, झुडपे जेसीबीच्या साह्याने काढण्यात येत आहेत. याकरीता ट्रॅक्टर फळीच्या सहाय्याने लेव्हलिंग करण्यात येत आहे. दगड -गोटे उचलण्यात आले आहेत, अनावश्यक झाडाच्या फांद्या छाटून घेण्यात आल्या आहेत. तसेच भक्तीवसागर ६५ एकर येथे मशीनच्या साह्याने परिसरातील साफसफाई व स्वच्छता करण्यात येत आहे. प्लॉटला नंबरिंग करणे , कायमस्वरूपी शौचालय दुरुस्तीची कामे युध्दपातळीवर सुरु आहेत.